देहुरोड पोलीस स्टेशन,
पिंपरीचिंचवड पोलीस आयुक्तालय
पत्ता:-जुना पुणे-मुंबई हायवे, सेंट्रलचौक, देहुरोड, पुणे.
फोन नं.०२०-२७६७१२८८
ई-मेल आयडी-psdehuroad.pcpc-mh@gov.in

# देहुरोड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगीरी

## वाहन चोरी करणारा देहूरोड पोलीस स्टेशन तपास पथका कडून अटक

देहुरोड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये दि. २९/०३/२०२४ रोजी स्वामी चौक, ब्रिज खाली देहुरोड पुणे येथुन अज्ञात चोराने फिर्यादी नामे चंद्रकांत इरन्ना तलारी यांची मोटार सायकल चोरी करून नेली त्यांचे तक्रारीवरून देहूरोड पो.स्टे. गु.रजि.नं. १६७/२०२४ भादंवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल झाला.

दाखल गुन्ह्याचे घटनास्थळी व लगतच्या परिसरात सीसीटीव्ही फुटेज नसताना तसेच अज्ञात आरोपी बाबत काही एक माहिती नसताना देहूरोड पोलीस स्टेशनचे तपास पथक गुन्ह्याचा तपास करीत असताना पोलीस अंमलदार मोहसीन आत्तार व शुभम बावणकर यांना गोपणीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम चोरीची मोटार सायकल घेवुन शिवाजी विद्यालयाजवळ, देहूरोड, पुणे येथे थांबला आहे. सदर ठिकाणी जावुन आरोपी नामे रविंद्र सुरेश सातोळे, वय १९ वर्षे, रा. पाण्याच्या टाकीजवळ, गांधीनगर, देहूरोड, पुणे याला दाखल गुन्ह्यातील मोटार सायकलसह ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन येथे आणुन त्याचेकडे तपास केला. त्याने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. आरोपी नामे रविंद्र सुरेश सातोळे याला अटक करून त्याची पोलीस कोठडी रिमांड मिळुन त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याने देहूरोड पो.स्टे.गुरनं. १६६/२०२४ भादंवि कलम ३७९, देहूरोड पो.स्टे. गु.रजि.नं. १७६/२०२४ भादंवि कलम व पिंपरी पो.स्टे. १३७/२०२४ भादंवि कलम ३७९ प्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले असुन त्याचेकडुन नमुद गुन्ह्यातील ०३ मोटार सायकली हस्तगत करण्यात आल्या आहेत.

अद्याप पर्यंत एकुण १,६५,०००/- रुपये किंमतीच्या एकुण ०४ मोटार सायकली हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. देहूरोड पोलीस स्टेशनचे ०३ व वाकड पोलीस स्टेशनचा ०१ असे एकुण ०४ गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले आहे. देहूरोड पोलीस अधिक तपास करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनयकुमार चौबे सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, मा. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ–२ बापू बांगर सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग श्री. घेवारे सो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय वाघमारे, यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अजयकुमार राठोड, पोलीस अंमलदार प्रशांत पवार, बाळासाहेब विधाते, संतोष जाधव, सुनिल यादव, किशोर परदेशी, प्रशांत माळी, केतन कानगुडे, संतोष महाडीक, निलेश जाधव, मोहसिन आत्तार, युवराज माने, शुभम बावनकर, स्वप्नील साबळे, सागर पंडीत यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

03/04/2024

(बापु बांगर)
पोलीस उप-आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी-चिंचवड.